MKCL
Creating a Knowledge Lit World
www.mkcl.org

दिनांक: २० नोव्हेंबर २०१६
संदर्भ क्रमांक: एमकेसीएल:२०१६/MS-CIT/०२

**विषय : 'वर्ष २०१७ साठी MS-CIT अभ्यासक्रमाच्या कार्यान्वयनातील बदल'**

**प्रिय MS-CIT केंद्र समन्वयक,**

**सप्रेम नमस्कार,**

आपल्या केंद्रांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांतील युवांसाठी MKCL चा MS-CIT/तत्सम असा आंतरराराष्ट्रीय दर्जाचा रोजगाराभिमुख कौशल्य विकास अभ्यासक्रम MKCLच्या English Communication + Soft Skills संबंधीच्या पूरक अभ्यासक्रमांसह मोठ्या प्रमाणावर राबवण्याचे महाराष्ट्र शासनाच्या विचाराधीन असल्याने आपल्या प्रचलित कार्यान्वयनात या संभाव्यतेशी सुसंगत असे बदल वर्ष २०१७ मधील बॅचेस सुरु करताना करणे आवश्यक आहे.

हे बदल करताना वरील पार्श्वभूमीबरोबरच अनेक केंद्र संचालकांनी व्यक्त केलेल्या अडी-अडचणी, स्पर्धात्मक वास्तवात व्यवसाय वृद्धीसाठी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी वेळोवेळी मनमोकळेपणाने केलेल्या उपयुक्त सूचना; विद्यार्थी, पालक, एम्प्लॉयर्स, इ. कडून प्राप्त झालेला फीड्बॅक व त्यांच्या अपेक्षा व सूचना; माहिती-तंत्रज्ञानात झपाट्याने होत असलेले बदल व त्यांचे समाजावर व उद्योग विश्वावर होत असलेले इष्ट-अनिष्ट परिणाम, ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या बदललेल्या आशा-आकांक्षा; त्यांना प्राप्त होऊ घातलेल्या नवनवीन करिअर संधी; देशातील नवे कौशल्य विकास कार्यक्रम व धोरणे, इ. चा सुयोग्य मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यामुळे वर्ष २०१७ मध्ये प्रवेश करत असताना MS-CIT अभ्यासक्रमाच्या कार्यान्वयनातील या महत्वाच्या बदलांबाबत जानेवारी २०, २०१७ च्या बॅचची केंद्रांमधील पूर्वतयारी सुरु होण्याआधी हे सविस्तर पत्र पाठवत आहे.

या पत्राचा पहिला कच्चा मसुदा आपल्या विचारार्थ पाठवला होता. तो प्रदीर्घ असला तरी महत्वाचा असल्याने आपण वेळात वेळ काढून केंद्रातील आपल्या सर्व सहकाऱ्यांबरोबर त्याचे काळजीपूर्वक सहवाचन करावे व त्यांच्याबरोबर सविस्तर चर्चा करावी अशी विनंती केली होती. तसेच आपले त्यासंबंधीचे प्रश्नही मागवण्यात आले होते. त्यातील बऱ्याच प्रश्नांसंबंधी दिनांक १५ नोव्हेंबर रोजी वेबकास्टद्वारे स्पष्टिकरण देण्यात आले व प्राप्त झालेल्या काही उपयुक्त सूचनांचा स्वीकार केल्याचेही तात्काळ घोषित करण्यात आले. इतर अडचणींचा तसेच विशेषत: उन्हाळी सुट्टीतील मेगाबॅचसंबंधी केंद्रांपुढील प्रश्नांचा काळजीपूर्वक व सकारात्मक विचार व त्यावरील केंद्रांनी प्रस्तावित केलेल्या व्यवहार्य सूचनांचा स्वीकार करून हा पक्का मसुदा आपल्याला पाठवण्यात येत आहे. यातील आशयाला अनुसरून वर्ष २०१७ साठी आपल्या केंद्राला वापरावयाचे प्रसिद्धी साहित्य छापावे ही विनंती.

यापुढे वेळोवेळी येणारे अनुभव/अडचणी संवेदनशीलपणे विचारात घेवून व प्राप्त होणाऱ्या सूचनांचा उपयोग करून मूळ आराखड्याला बाधा न आणता त्यात केंद्रांच्या व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सातत्याने fine tuning करण्यात येईल.

## १. शिक्षणाची 'क्लासरूम + लॅब' रचना

वर्ष २०१७ पासून MS-CIT च्या बॅचेस तीन/चार/पाच/सहा महिन्यांच्या असणार नाहीत. आता MS-CIT च्या सर्व बॅचेसचा कालावधी २ महिन्यांचाच असेल. विशिष्ट विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी खाली स्पष्ट केल्याप्रमाणे ४ महिन्यांपर्यंत वाढविता येईल.

पूर्वी प्रमाणेच वर्ष २०१७ मध्ये देखील MS-CIT च्या प्रत्येक विद्यार्थ्यास दररोज २ तास केंद्रात उपस्थित राहून शिक्षण घेणे आवश्यक आहे. या २ तासांपैकी त्याने प्रथम १ तास क्लासरूममध्ये आपल्या ग्रुपमधील इतरांबरोबर व नंतर १ तास कंप्यूटर लॅबमध्ये १ संगणक एकट्याने स्वतंत्ररीत्या वापरून शिकायचे आहे. त्यामुळे केंद्रात सर्वसाधारणपणे समान बैठक संख्येच्या क्लासरूम्स व कंप्यूटर लॅबस् च्या जोड्या आवश्यक आहेत.

*उदा. एकाच ERA server ला जोडलेली २० बैठक संख्येची एक क्लासरूम व २० बैठक संख्येची १ लॅब अशी जोडी किंवा २० बैठक संख्येची एक क्लासरूम व १० बैठक संख्येच्या २ लॅबस्, इ... अशी व्यवस्था असावी. या व अशा रचनांमध्ये एका वेळी क्लासरूमसाठी १ व १ किंवा २ लॅबस् साठी मिळून १ असे २ लर्निंग फॅसिलीटेटर्स/LFs म्हणजेच सुलभक आवश्यक असतील.*

*पण एकाच ERA server ला जोडलेल्या १० बैठक संख्येच्या २ क्लासरूमस् व २० बैठक संख्येची १ लॅब अशी रचना केल्यास renewal साठी चालू शकेल. पण एका वेळी २ क्लासरूमस् साठी २ व १ लॅबसाठी १ असे ३ लर्निंग फॅसिलीटेटर्स/LFs म्हणजेच सुलभक नियुक्त करणे खर्चिक ठरेल.*

वरील रचनेत विद्यार्थ्याला ERA मधील inform content हा LF login द्वारे क्लासरूम मध्ये (प्रत्येकाने कानाला स्वतंत्र हेडफोन न लावता, एकाच प्रोजेक्टर व स्पीकरद्वारे) सगळ्यांबरोबर एकत्र शिकायचा आहे आणि लॅबमध्ये एकट्याने १ संगणक स्वतंत्रपणे वापरून ERA मधील perform content (challenges, bigger challenges, do-it-yourself, English and/or देवनागरी -मराठी/हिंदी- typing, session-end tests, etc.) स्वत:चे Learner Login वापरून कृतीद्वारे व सरावाद्वारे शिकायचा आहे. त्याचबरोबर लॅबमध्ये ERA बाहेर जावून विविध ऑफिस टूल्सचा सरावही करायचा आहे. लॅबमध्ये आवश्यकतेनुसार काही वेळ विद्यार्थ्याने हेडफोन व माईक वापरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला perform content बरोबरच क्लासरूम मधील inform content ही गरज पडल्यास Learner Login मध्ये उपलब्ध करून देता येईल.

*उदाहरण: एका केंद्रात १० विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था असलेली क्लासरूम व १० विद्यार्थ्यांसाठी (१+१०) संगणक असलेली कम्प्यूटर लॅब असेल तर दररोज विविध ग्रुप्सना खाली दर्शविल्याप्रमाणे शिक्षण घेता येईल:*

| Time Slot in a Typical Day | Classroom For Learner Group | Computer Lab For Learner Group |
|---|---|---|
| 7 am to 8 am | **A** | ** |
| 8 am to 9 am | **B** | **A** |
| 9 am to 10 am | C | B |
| 10 am to 11 am | **D** | **C** |
| 11 am to 12 noon | E | D |
| 12 noon to 1 pm | **F** | **E** |
| 1 pm to 2 pm | **##** | F |

** **दिवसाचा पहिला राखीव तास:** अनुपस्थितांना हुकलेली लॅब लगेच भरून काढण्यासाठी व इतरांना एक्स्ट्रा सरावासाठी. ## **दिवस अखेरचा राखीव तास:** अनुपस्थितांना हुकलेली क्लासरूम लगेच भरून काढण्यासाठी व इतरांना एक्स्ट्रा उजळणीसाठी. या दोन्ही तासांसाठी विद्यार्थ्यांनी ॲडव्हान्स बुकिंग करणे आवश्यक.

थोडक्यात A ग्रुप सकाळी ७ ते ९ या वेळेत शिकेल तर B ग्रुप त्यापाठोपाठ म्हणजे सकाळी ८ ते १० या वेळेत शिकेल. त्यासाठी ERA मध्ये लर्नर डेटा डाउनलोड होताना तो टाईम स्लॉटनुसार करण्याची व्यवस्था असेल.

एका ग्रुपमधील विद्यार्थ्याला सोयीच्या वेळेच्या दुसऱ्या ग्रुप मध्ये transfer करता येईल. तसेच एका ग्रुपमधील विद्यार्थ्याला त्याच्या सोयीच्या वेळेप्रमाणे एका Time Slot मधून दुसऱ्या Time Slot मध्येही transfer करता येईल याची नोंद घ्यावी.

कोणत्याही ग्रुपच्या लॅबमधील रिकाम्या राहिलेल्या मशीन्सवर KLiC चे प्रवेश करता येतील. मात्र KLiC साठी स्वतंत्र लॅब असल्यास उत्तम.

अशा पद्धतीने क्लासरूममध्ये inform content शिकून प्रत्येक ग्रुपचे विद्यार्थी पुढच्या तासाला लॅबमध्ये perform content शिकतील. दुपारी २ पर्यंतचे वरील टाईम स्लॉटस् फक्त उदाहरणादाखल दर्शविले आहेत. प्रत्यक्षात रात्री ८ किंवा ९... वाजेपर्यंतही केंद्राच्या सोयीप्रमाणे पुढील टाईम स्लॉट उपलब्ध असतीलच व G,H,I,J,K,L,... ग्रुपचे विद्यार्थी त्यात शिकतील.

शक्यतो एका ग्रुपमध्ये (A,B,C,D,...) एकाच माध्यमाच्या (इंग्लिश/मराठी/हिंदी) विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. क्लासरूममध्ये ते सोयीचे होईल. भिन्न माध्यमाचे विद्यार्थी एकाच ग्रुपमध्ये घेणे भाग पडल्यास अर्थातच सर्व विद्यार्थ्यांच्या सोयीने योग्य/मिश्र/बहु माध्यमांचा सलग/आलटून-पालटून वापर करता येईल.

## २. Intake Capacityचे नियम:

दिवस भरात प्रत्येक संगणक साधारणपणे १२/१४/१६ तास वापरला जाईल असे गृहीत धरून व बॅचच्या कालावधीत प्रत्येक विद्यार्थ्यास दररोज १ तास १ संगणक स्वतंत्ररीत्या वापरण्यास द्यायचा असल्याने वर्ष २०१७ पासून MS-CIT कोर्सच्या प्रती बॅच (म्हणजे जानेवारी २०१७, मार्च २०१७, इ.) Intake Capacity चे नियम खालीलप्रमाणे राहतील:

| **संगणक संख्या** | **प्रती बॅच Intake Capacity:**<br>**ALC मध्ये <u>किमान आवश्यक वर्गखोली</u> (क्लासरूम) व संगणक प्रयोगशाळा (कंप्यूटर लॅब) साठी** |
|---|---|
| **५ Client संगणकांसाठी** | **६०/७०/८०** |
| **१० Client संगणकांसाठी** | **१२०/१४०/१६०** |
| **प्रत्येक Extra Client संगणकासाठी** | **१२/१४/१६**<br>• एका किमान ठरवून दिलेल्या सर्व्हर configuration साठी २०Client संगणकांपेक्षा अधिक संगणक जोडता येणार नाहीत. सर्व्हरच्या higher configuration नुसार २० पेक्षा जास्त Client संगणक जोडता येतील असा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल.<br>• प्रवेशसंख्या वाढवायची असल्यास intake capacity वाढवून घेण्यासाठी एक्स्ट्रा संगणकांबरोबर क्लासरूमच्या मॅचिंग बैठक संख्येचीही वाढीव सोय करावी लागेल. |

- त्यामुळे **एक वर्गखोली** असलेल्या व **१+५ संगणक** (ग्रामीण भागात) असलेल्या केंद्रांची कमाल वार्षिक (६ बॅचेस मिळून) इनटेक कपॅसिटी **३६०/४२०/४८० विद्यार्थी** इतकी तर एक वर्गखोली असलेल्या व **१+१० संगणक** (शहरी/ग्रामीण भागात) असलेल्या केंद्रांची कमाल वार्षिक (६ बॅचेस मिळून) इनटेक कपॅसिटी **७२०/८४०/९६० विद्यार्थी** इतकी असेल.
- **क्लासरूम-कम-लॅब असा सेट-अप** असलेल्या व **१+५ संगणक** (ग्रामीण भागात) असलेल्या केंद्रांची कमाल वार्षिक (६ बॅचेस मिळून) इनटेक कपॅसिटी **१८०/२१०/२४० विद्यार्थी** इतकी तर **क्लासरूम-कम-लॅब असा सेट-अप** असलेल्या व **१+१० संगणक** (शहरी/ग्रामीण भागात) असलेल्या केंद्रांची कमाल वार्षिक (६ बॅचेस मिळून) इनटेक कपॅसिटी **३६०/४२०/४८० विद्यार्थी** इतकी असेल.
- सर्व eContent हे ERA Server Machineवर असेल. क्लासरूममधील machine सुद्धा ERA Server Machineशी LAN/Wi-Fiद्वारे जोडावे लागेल. क्लासरूममधील machineवर LF त्यांचे लॉगीन करून क्लासरूममध्ये (प्रोजेक्टर व स्पीकरचा उपयोग करून) निरनिराळे कंटेंट ERA मधून क्रमश: सादर करतील.
- वेगळी क्लासरूम नसलेल्या व क्लासरूम-कम-लॅब असा सेट-अप असलेल्या केंद्रांसाठी लॅबमधील सर्व विद्यार्थ्यांच्या client machines संबंधित LF च्या client machine शी sync करण्याची सुविधा ERA मधून देण्यात येईल व inform content प्रोजेक्टर न वापरता शिकवता येईल.
- अनधिकृत केंद्रांना आळा घालण्यासाठी एकापेक्षा जास्त Server Machineवर ERA ॲक्टीव्हेशन परस्पर करता येणार नाही. जर एकापेक्षा जास्त Server Machineवर ERA प्रणालीचे ॲक्टीव्हेशन करायचे असेल तर MKCLची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.
- MKCL Secured Browserच्या माध्यमातूनच ERA प्रणालीचा वापर विद्यार्थ्यांना व LFना करता येईल. दुसऱ्या कोणत्याही Browser च्या माध्यमातून ERA प्रणालीचा वापर करता येणार नाही.
- MKCL Secured Browserच्या माध्यमातून ERA प्रणालीचा वापर केल्यामुळे एकावेळी एका Machineवर एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे ERA लॉगीन होणार नाही. तसेच एकापेक्षा जास्त Machineवर एका विद्यार्थ्याचे एकावेळी ERA लॉगीन होणार नाही.
- WORM Softwareमध्ये MAC ID बदलून एकच Machineमागे एकापेक्षा जास्त वेळा **Intake Capacity** घेता येणार नाही.

## ३. Projector (प्रोजेक्टर)/ TV

- काही केंद्रांमध्ये यापूर्वीच क्लासरूम मध्ये TV सेट लावलेला आहे. अशा केंद्राना Projector लावावा लागणार नाही. ज्या केंद्रामध्ये यापूर्वी TV सेट लावलेला नाही त्यांना क्लासरूम/लॅब मध्ये Projector (प्रोजेक्टर) अथवा TV सेट लावता येईल.

## ४. MS-CIT २०१७ मधील लर्निंग टॉपिक्स, बॅचचा कालावधी, एकूण तास, सेशन्सची दैनंदिन व एकूण संख्या व आशय आणि अंतर्गत मूल्यमापन पद्धत:

### A. MS-CIT २०१७ मधील लर्निंग टॉपिक्स:

शैक्षणिक वर्ष २०१७ साठी MS-CIT च्या अभ्यासक्रमात खालील टॉपिक्स समाविष्ट करण्यात आले आहेत:

1. विंडोज 7
2. एमएस वर्ड 2013
3. एमएस एक्सेल 2013
4. एमएस पॉवरपॉइंट 2013
5. इंटरनेट
6. पर्सनल इंफॉर्मेशन मॅनेजर
7. इंग्लिश व/किंवा देवनागरी (मराठी/हिंदी) टायपिंग

### B. MS-CIT कोर्सच्या प्रत्येक बॅचचा एकूण कालावधी: २ महिन्यात १४४ तास

1. बॅचचा कालावधी: ५० कामाचे दिवस
2. म्हणजेच रविवार व सुट्ट्या विचारात घेता प्रत्येक बॅचचा कालावधी ६० दिवस किंवा दोन महिने
3. MKCL तर्फे वर्ष २०१७ च्या सुट्या निश्चित करून जाहीर करण्यात येतील. या सुट्या निश्चित करत असताना स्थानिक सुट्यांचा सुद्धा समावेश करण्यात येईल. सर्व रविवार व जाहीर केलेल्या सुट्ट्या सोडता इतर दिवशी केंद्र चालू ठेवावे लागेल. काही अपरिहार्य कारणास्तव कामाच्या दिवशी केंद्र बंद ठेवणे भाग पडल्यास solar login मधून आगाऊ विनंती पत्र पाठवून पूर्वपरवानगी घ्यावी लागेल व राहिलेला अभ्यासक्रम सुट्टीच्या दिवशी विद्यार्थ्यांना बोलवून वेळेत पूर्ण करून घ्यावा लागेल.
4. प्रत्येक बॅचचा एकूण कालावधी: १४४ तास
   a) प्रत्येक विद्यार्थ्याचे केंद्रातील शिक्षण, प्रशिक्षण, सराव व अंतर्गत मूल्यमापन: १०० तास
   b) केंद्रातील संगणकावर अतिरिक्त (एक्स्ट्रा) सराव करण्यासाठी: ७ तास (दिवसाचा पहिला राखीव तास)
   c) वैयक्तिक शंका समाधान/मार्गदर्शन/क्लासरूम उजळणी: ७ तास (दिवस अखेरचा राखीव तास)
   d) घरी पुस्तकवाचन, स्वयंअध्ययन व गृहपाठ: ३० तास
5. प्रत्येक दैनंदिन सेशन = २ तास = १ तास:- क्लासरूम अवर (hour) + पुढचा १ तास:- लॅब अवर
6. प्रत्येकी २ तासांच्या सेशन्सची एकूण संख्या:- ५० (५० क्लासरूम अवर्स + ५० लॅब अवर्स = १०० तास)
7. ५० सेशन कम्प्लिशन इ-सर्टिफिकेटस्
8. ऑफिस एक्स्पर्ट इ-सर्टिफिकेटस्

9. टायपिंग इ-सर्टिफिकेट

## C. प्रत्येक क्लासरूम अवरचे स्वरूप:

प्रत्येक क्लासरूम अवरमध्ये (प्रोजेक्टर व स्पीकरचा उपयोग करून) निरनिराळे कंटेंट ERA मधून LF सादर करतील. त्याबरोबरच ते विद्यार्थ्यांशी संवाद साधतील व त्यांना शिकण्यासाठी मार्गदर्शन देखील करतील.

| Part क्र. | तपशील | अवधी |
|---|---|---|
| Part-1 | **पहिल्या दिवशी :S4 अर्थात संयुक्त स्वागत व समारोप समारंभ**<br>**इतर दिवशी: प्रोसेसफ़ोलिओ कृतीदर्शन (डेमो):** लॅब सेशनमध्ये विद्यार्थ्यांनी आदल्या दिवशी तयार केलेल्या केलेल्यापैकी ३ निवडक do-it-yourself प्रोसेसफ़ोलिओज् चे LF तर्फे कृतीदर्शन व त्यानंतर LF व विद्यार्थ्यांकडून रसग्रहण/ चर्चा/ सूचना/ प्रश्नोत्तरे/ collaboration/शाबासकी/ प्रोत्साहन ... | १५ मिनिटे |
| Part-2 | **लर्निंग कंटेन्ट:** पुस्तकातील आशयाचे आणि वर दिलेल्या ७ टॉपिक्सचे ERA मधून क्रमश: सादरीकरण व LF तर्फे उदाहरणासह स्पष्टिकरण (उदा. ग्रिटींग कार्ड, कंपनी प्रेझेंटेशन, मासिक बजेट, इ.), आदर्श प्रोसेसफोलिओचे सादरीकरण व लॅबमध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: करण्याविषयीच्या टिप्स | ३० मिनिटे |
| Part-3 | **आजचे आकर्षण:** ERA मधून नव्या उपयुक्त वेबसाइट्स, नवी उपयुक्त मोबाईल ॲप्स, नवी ICT Applications तसेच गो ग्रीन, नेटीकेट्स, एर्गोनॉमिक्स, इ. च्या स्मार्ट टिप्स | १० मिनिटे |
| | **एकूण वेळ** | **५५ मिनिटे*** |

*५ मिनिटे लॅब अवर पूर्वीचे मध्यंतर

LF login मध्ये केवळ LF ला दिसेल अशा नोट्स-व्ह्यू मधून विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी उपयुक्त अशा अतिरिक्त आशय/टिप्स देण्यात येतील.

## D. प्रत्येक लॅब अवरचे स्वरूप:

प्रत्येक लॅब अवरमध्ये प्रत्येक विद्यार्थी स्वतंत्र संगणकावर ERA प्रणालीतून व वेगवेगळया टूल्सचा वापर करून सराव करेल. तसेच त्याचे दैनंदिन अंतर्गत मूल्यमापनही पूर्ण केले जाईल.

| Part क्र. | तपशील | अवधी | पॉईंट्स |
|---|---|---|---|
| Part-1 | **हॅन्ड्स-ऑन प्रॅक्टिस:** इंग्लिश व/किंवा देवनागरी (मराठी/हिंदी) टायपिंग सराव | १० मिनिटे | Speed (Words Per Minute-wpm) |

| | | | |
|---|---|---|---|
| Part-2 | **प्रोसेसफ़ोलिओ / डू-इट-युवरसेल्फ:** क्लासरूम अवरमध्ये शिकलेल्या कंटेन्टवर आधारित सराव व प्रोसेसफ़ोलिओज् (उदा. ग्रिटींग कार्ड, कंपनी प्रेझेंटेशन, मासिक बजेट इ) | ३० मिनिटे | - |
| Part-3 | टेक-अ-चॅलेंज व टेक-अ-बिगर- चॅलेंज: ५ ब्लू चॅलेंजेस् | १० मिनिटे | ५० |
| Part-4 | **सेशन कंप्लिशन टेस्ट:** एकूण १० रेड चॅलेंजेस (त्या दिवशीच्या क्लासरूम अवरवर आधारित ५ ऑब्जेक्टिव प्रश्न + लॅब अवरवर आधारित ५ प्रॅक्टिकल प्रश्न) अंतिम ऑनलाईन परीक्षेच्या दैनंदिन सरावासाठी त्या परीक्षेसारख्याच User Interface (UI) सह | १० मिनिटे | ५० |
| | **एकूण वेळ** | **६० मिनिटे** | **१००** |

1. प्रत्येक लॅब अवरमध्ये कमाल १०० पॉईंट्स स्कोअर करता येतील व नंतर त्याचे स्कोअर केलेल्या पॉईंट्सच्या प्रमाणात कमाल १ गुणात रूपांतर केले जाईल. (उदा. १०० पैकी ५० पॉईंट्स स्कोअर केल्यास १ पैकी ०.५ गुण)
2. सर्वसामान्य विद्यार्थ्यांची आकलन क्षमता, शिकण्याचा वेग व १०० तासांची कालमर्यादा नजरेसमोर ठेवून सध्याच्या अभ्यासक्रमात व सेशन प्लॅनमध्ये योग्य ते बदल करून २० डिसेंबर २०१६ पर्यंत केंद्रांना कळवण्यात येतील.

## E. अंतर्गत मूल्यमापन पद्धत: एकूण : ५० गुण

1. MS-CIT च्या अंतिम परीक्षा पात्रतेसाठी किमान ४० सेशन्सचे (क्लासरूम आणि लॅबमधील) शिक्षण व सराव पूर्ण करणे व विशिष्ट तारखेपर्यंत २० गुण मिळवणे आवश्यक आहे.
2. पहिल्या ४० सेशन्समध्ये (कमाल ४० गुणांसह) खालील गोष्टी साध्य करणे अपेक्षित आहे:
   - लर्निंग कंटेंटच्या माध्यमातून क्लासरूम आणि लॅब सेशनमधून मिळवलेली **प्राथमिक कौशल्ये**
   - टेक-अ- चॅलेन्जच्या माध्यमातून कंप्यूटर वापराची तोंडओळख
3. पुढील १० सेशन्समध्ये (उर्वरित कमाल १० गुणांसह) खालील गोष्टी साध्य करणे अपेक्षित आहे:
   - वर नमूद केलेल्या टॉपिक्सवर आधारित सिच्युएशन्स व रियल लाइफ केस स्टडीजच्या माध्यमातून मिळवलेली **प्रगत कौशल्ये**
   - रियल लाइफ केसस्टडीज व प्रगत कौशल्यांवर आधारित टेक-अ-बिगर-चॅलेन्जच्या माध्यमातून कंप्यूटर वापरण्याचा आत्मविश्वास

## F. विद्यार्थ्यांची अनुपस्थिती हाताळण्याची कार्यपद्धती व गुणांवरील परिणाम

1. विद्यार्थ्याला एका दिवसात त्याला नेमून दिलेल्या २ तासांच्या टाईमस्लॉटस् मध्ये एका सेशनचे (म्हणजेच १ क्लासरूम+१लॅबचे) लर्निंग पूर्ण करता येईल.
2. जर एखादा विद्यार्थी त्याला नेमून दिलेल्या टाईमस्लॉटस् (उदा. 7am to 8am-क्लासरूम व 8am to 9am लॅब) मधल्या सेशनला अनुपस्थित राहिला तर त्याला त्याच दिवशीच्या इतर उपलब्ध स्लॉटस् मध्ये ते सेशन LF च्या संमतीने पूर्ण करता येईल. त्यामुळे तो पुढच्या दिवशी आपल्या ग्रुपबरोबर पुढील सेशन शिकेल.

3. जर त्या विद्यार्थ्याने ते सेशन त्याच दिवशी पूर्ण केले नाही तर ते पेंडिंग लिस्ट मध्ये ठेवले जाईल व त्याला पुढच्या दिवशी आपल्या ग्रुपबरोबर पुढील सेशन शिकता येईल. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची संभाव्यता लक्षात घेऊन बहुतेक सेशन्स मागील सेशन्सवर फार अवलंबून ठेवलेली नाहीत. त्यामुळे ती नंतर पूर्ण करणे शक्य होईल.
4. पेंडिंग लिस्ट मधील सेशन्स त्याला कोर्स संपायच्या आत सवडीने पूर्ण करता येतील. पण सेशन पूर्ण करेपर्यंत त्या सेशनचे गुण मात्र मिळणार नाहीत.
5. एक रेगुलर सेशन व एक पेंडिंग लिस्ट मधील सेशन अशी कमाल दोनच सेशन्स एका दिवशी पूर्ण करता येतील.
6. २० जानेवारी, २० जुलै, २० सप्टेंबर व २० नोव्हेंबर अशा ४ दुमाही बॅचेस करिता पेंडिंग लिस्ट मध्ये एकूण ४ सेशन्स ठेवली जातील. त्यातील ३ सेशन्स हे विद्यार्थ्यांच्या हातात असतील तर एक सेशन हे केंद्राकडे (स्वत:च्या संभाव्य अडचणीवर मात करण्यासाठी) राखीव असेल. योग्यवेळी केंद्र ते राखीव सेशन विद्यार्थ्याला गरज भासल्यास उपलब्ध करून देऊ शकतील.
7. पेंडिंग लिस्ट मध्ये एका वेळी ४ पेक्षा जास्त सेशन ठेवली जाणार नाहीत. उदा. विद्यार्थ्याच्या अनुपस्थितीमुळे पेंडिंग लिस्ट मध्ये आता सेशन क्रमांक ११, १५, १९ व २३ आहेत. पण तो सेशन क्रमांक २८ लाही अनुपस्थित राहिला तर सेशन क्रमांक ११ पेंडिंग लिस्ट मधून आपोआप वगळले जाईल. त्यामुळे त्या सेशनमधील कंटेंट त्याला उपलब्ध राहील व ते तो दिवसाच्या पहिल्या व अखेरच्या राखीव तासांत बघू/ऐकू शकेल पण त्या सेशनचा १ गुण आता त्याला कायमचा गमवावा लागेल. तो त्याला कधीच मिळणार नाही.
8. उन्हाळी सुट्टीतील बॅचेस विचार करिता पेंडिंग लिस्ट मध्ये ४ ऐवजी एकूण ६ सेशन्स ठेवली जातील. त्यातील ५ सेशन्स हे विद्यार्थ्यांच्या हातात असतील तर एक सेशन हे केंद्राकडे राखीव असेल. योग्यवेळी केंद्र ते राखीव सेशन विद्यार्थ्याला उपलब्ध करून देऊ शकतील.
9. रविवार व जाहीर केलेल्या सुट्ट्या सोडता इतर दिवशी काही अपरिहार्य कारणास्तव केंद्र (पूर्णपणे/अंशत:) बंद ठेवणे भाग पडल्यास दुसऱ्या दिवशी संबंधित विद्यार्थ्यांना हुकलेले सेशन पेंडिंग लिस्ट मध्ये न जाता नेहमीप्रमाणे शिकता येतील. अशा केंद्राने हुकलेला दिवस शक्यतो लगेच येणाऱ्या पुढच्या रविवारी भरून काढून पुन्हा राज्यातील इतर सर्व केंद्रांबरोबर राहणे अपेक्षित आहे.
10. जे विद्यार्थी MS-CIT परीक्षेसाठी लागणारी पात्रता (किमान ४० सेशन्सच्या शिक्षणाची पूर्तता व अंतर्गत मूल्यमापनात किमान २० गुण) दिलेल्या २ महिन्याच्या मुदतीत पूर्ण करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांना केंद्राने निश्चित केलेली अतिरिक्त फी केंद्रास देऊन उर्वरित सेशन्स् पूर्ण करावी लागतील. (या अतिरिक्त फी मध्ये MKCLचा वाटा असणार नाही.) अशी मुदतवाढ मात्र जास्तीत जास्त २ महिन्यांसाठी मिळेल व विद्यार्थ्यांचे ERA login त्या दोन महिन्यांसाठी MKCL तर्फे विनामूल्य चालू ठेवण्यात येईल. त्याने उर्वरित सेशन्स् चालू बॅचबरोबर पूर्ण करावी व पुढच्या दुमाही परीक्षेस बसावे.
11. अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या बाबतीत केंद्राने नक्की कशाप्रकारे व्यवस्थापन करावे हे दररोज त्या त्या विद्यार्थ्याच्या व LF च्या लॉगीनमध्ये automatically ERA software मधून सूचित केले जाईल. त्या विद्यार्थ्याने या सूचनेनुसार सेशन न घेतल्यास automatically ERA software मधून पुढचा नवीन प्लॅन सुचवला जाईल. त्याला तसे SMS द्वारेही सूचित केले जाईल. म्हणजेच केंद्राने काळजी करत बसण्याची गरज पाडणार नाही. Dynamic Calendar सुविधेद्वारे learner लॉगीनमधून प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची प्रगती / backlog/ नवीन प्लॅन इ. सतत दाखविण्यात येईल.

12. ERA मधील काही तांत्रिक अडचणीमुळे समजा विद्यार्थ्यांचे सेशन त्या वेळी पूर्ण होऊ शकले नाही तर ते उरलेले सेशन विद्यार्थ्यांना दिवसभरात कधीही करता येईल किंवा केंद्राकडे राखीव असलेल्या पेंडिंग लिस्ट मध्ये ठेवून नंतर पूर्ण करता येईल.

## G. Office 365 ऑनलाईन सुविधा:

MS-CIT साठी नोंदणी केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला Office 2013 साठी केंद्रात उपलब्ध करून देण्यात आलेल्या सरावाव्यतिरिक्त अधिक सराव करण्यासाठी एक ऑनलाईन लॉगीन उपलब्ध करून देण्यात येईल. या लॉगीनचा उपयोग केल्यास क्लाऊडवर उपलब्ध करून दिलेल्या Office 365 चा ॲक्सेस प्रत्येक विद्यार्थ्याला मिळेल. Office 365 चा उपयोग करून प्रत्येक विद्यार्थी आता वर्ड, एक्सेल, पॉवरपॉइंट या टूल्सचा भरपूर सराव घरबसल्याही करू शकतील. मात्र ERA तील सेशन्सचा ॲक्सेस केंद्राबाहेर मिळणार नाही.

Office 365 वापरण्यासाठी आवश्यक असलेल्या संगणक व इंटरनेटची व्यवस्था विद्यार्थ्याला स्वत:ची स्वत: व स्वखर्चाने करावी लागेल व तसे त्यांना माहिती पत्रकातून सूचित केले जाईल.

## H. MS-CIT उत्तीर्ण झाल्यावर विनामूल्य Refresh लॉगीन सुविधा:

Refresh लॉगीन या ऑनलाईन सुविधेमुळे कोर्स उत्तीर्ण झाल्यावर नोकरी करणाऱ्या विद्यार्थाला आपल्या नोकरीच्या ठिकाणाचे तपशील दिल्यास पुढील १ वर्ष मुदतीसाठी MS-CIT मध्ये शिकलेल्या कुठल्याही स्किलची विनामूल्य उजळणी आपल्या कामात आलेल्या अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यास 'Search Utility' वापरून तसेच MKCL Call Center शी संपर्क साधून करता येईल. Refresh लॉगीनमधून अख्खा कोर्स मात्र शिकता येणार नाही.

## I. वर्ष २०१७ मधील बॅचेसची संख्या, बॅचेसचे महिने व बॅचेस सुरू होण्याच्या तारखा:

1. वर्ष २०१७ पासून MS-CIT च्या बॅचेस तीन/चार/पाच/सहा महिन्यांच्या असणार नाहीत.
2. वर स्पष्ट केल्याप्रमाणे MS-CIT च्या सर्व बॅचेसचा कालावधी २ महिन्यांचाच असेल.
3. बॅचेस दरमहा सुरू न होता दर दोन महिन्यांनी सुरू होतील. म्हणजेच एक बॅच पूर्ण झाल्यावरच पुढची बॅच सुरू होईल.
4. त्यामुळे २०१७ मध्ये उन्हाळी सुट्टीच्या बॅचेसचा ४ महिन्यांचा काळ वगळता २० जानेवारी, २० जुलै, २० सप्टेंबर व २० नोव्हेंबर अशा ४ दुमाही बॅचेस उपलब्ध होतील.
5. प्रत्येक विद्यार्थ्याला MS-CIT चा प्रवेश घेत असताना स्वत:च्या आधार कार्डाची प्रत केंद्रात जमा करावी लागेल. विद्यार्थ्याची माहिती आधार कार्डशी पडताळली गेल्यामुळे विद्यार्थ्यांच्या माहितीमध्ये बदल करण्याची गरज भासणार नाही.
6. विद्यार्थ्यांना दररोज बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवावी लागेल.
7. उन्हाळी सुट्टीतील काही बॅचस वगळता उर्वरित प्रत्येक बॅचसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक असेल:
    a. विद्यार्थ्याने प्रवेश घेण्यासाठीची शेवटची तारीख: १५

b. केंद्राने प्रवेश solarवर निश्चित करण्याची शेवटची तारीख: १८

c. बॅचसाठी प्रशिक्षण सुरु करण्याची तारीख: २०

8. प्रत्येक बॅचचे व त्यातील प्रत्येक विद्यार्थ्याचे प्रशिक्षण हे २० तारखेलाच सुरु करायचे असल्यामुळे लेट फीचा (रु.१०/-, रु.२०/-, रु.४०/-) पर्याय उपलब्ध असणार नाही.
9. उन्हाळी सुट्टीत म्हणजे मार्च २०१७ ते जुलै २०१७ या काळात सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे बॅचेस व अंतिम परीक्षा उपलब्ध असतील:

| बॅच | प्रवेशाचा पहिला दिवस | प्रवेशाचा शेवटचा दिवस | बॅचचा शेवटचा दिवस | MS-CIT अंतिम online परीक्षेचा महिना |
|---|---|---|---|---|
| मार्च २०१७-अ | ०१ मार्च २०१७ | १५ मार्च २०१७ | १९ मे २०१७ | मे २०१७ |
| मार्च २०१७-ब | १६ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१७ | ०२ जून २०१७ | जून २०१७ |
| एप्रिल २०१७-अ | १ एप्रिल २०१७ | १५ एप्रिल २०१७ | १९ जून २०१७ | जून २०१७ |
| एप्रिल २०१७-ब | १६ एप्रिल २०१७ | ३० एप्रिल २०१७ | ०२ जुलै २०१७ | जुलै २०१७ |
| मे २०१७ | १ मे २०१७ | १५ मे २०१७ | १९ जुलै २०१७ | जुलै २०१७ |

10. उन्हाळी सुट्टी सोडता इतर सर्व बॅचेसचे सर्व ग्रुप्सचे ( उदा. Group A: 7am to 9 am; Group B: 8 am to 10 am….) शिक्षण एकाच ठराविक दिवशी म्हणजे २० जानेवारी, २० जुलै, २० सप्टेंबर व २० नोव्हेंबरला सुरु होतील. त्यानंतर त्या बॅचला नवीन विद्यार्थ्याला प्रवेश देता येणार नाही.
11. उन्हाळी सुट्टीतील बॅचेसच्यावेळी कोठल्याही एका ग्रुपचे प्रवेश करून लगेचच शिक्षण सुरु करता येईल. त्यासाठी २० तारखेची वाट बघावी लागणार नाही. केंद्राने शक्यतो त्या ग्रुपमधील पूर्ण प्रवेश करूनच शिक्षण सुरु करावे.
12. परंतू काही कारणास्तव त्या ग्रुपमधील पूर्ण प्रवेश न होता काही विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु करावे लागले तर मग automatically त्या ग्रुपमध्ये उरलेल्या जागांवर dummy विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. केंद्राला त्या dummy विद्यार्थ्यांच्या जागेवर योग्य त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पुढील ४ दिवसांच्या आत करून शिक्षण सुरु करावे लागेल.
13. समजा त्या dummy विद्यार्थ्यांपैकी थोड्याशा जागांवर वेळेत प्रवेश झाले नाहीत तर अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यावर त्यांचा वेगळा ग्रुप करून केंद्रातील अन्य छोट्या जागेत त्या थोड्या विद्यार्थ्यांना क्लासरूमसदृश सुविधा देता येईल व केंद्राचे संगणक रिक्त राहण्याने होणारे नुकसान टाळता येईल. तसेच अशा विद्यार्थ्यांचा वेगळा ग्रुप करून त्यांना क्लासरूम-कम-लॅब सुविधा देखील उपलब्धतेनुसार देता येईल.

## ५. MS-CIT शुल्क (फी):

| Mode | MS-CIT फी (रू.) | First Installment (रू.) | Second Installment (रू.) |
|---|---|---|---|
| Single Installment | 3500 | 3500 | N/A |
| Two Installments | 3600 | 1800 | 1800 |

1. MFO १-२ मोडची सुविधा उपलब्ध राहील.
2. प्रत्येक बॅचचा कालावधी हा २ महिन्यांचा असल्यामुळे Three Installmentsचा पर्याय उपलब्ध असणार नाही.

## ६. MS-CITअंतिम Online परीक्षा:

1. वर्ष २०१७ पासून MS-CITच्या अंतिम online परीक्षा सुद्धा दर महिन्यात न होता दर दोन महिन्यांनी एकदा होतील.
2. त्यामुळे २०१७ मध्ये जानेवारी, मार्च, मे, जुलै, सप्टेंबर, नोव्हेंबर अशा ६ महिन्यांत MS-CITच्या अंतिम online परीक्षा होतील.
3. उन्हाळी सुट्टीच्या बॅचेसचा पर्याय लक्षात घेऊन जून २०१७ महिन्यामध्येही MS-CITची अंतिम online परीक्षा होईल.
4. ज्या केंद्रात विद्यार्थी शिकत असतील त्याच केंद्रात शक्यतो त्यांची अंतिम परीक्षा घेण्यासाठी MSBTE शी चर्चा करण्यात येईल व त्यामुळे त्या केंद्रातील प्रत्येक दुमाही बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा एकाच दिवसात पार पडता येईल.
5. प्रत्येक बॅच महिन्याच्या २० तारखेला सुरु होईल व दोन महिने संपताना या बॅचच्या विद्यार्थ्यांची अंतिम online परीक्षा होईल.
    a. उदा. जानेवारी २०१७ ह्या बॅचच्या ॲडमिशन्स् १८ जानेवारी २०१७ पर्यंत करता येईल.
    b. या बॅचच्या विद्यार्थ्यांना २० मार्च २०१७ पर्यंत शिकता येईल व कोर्स संपल्यावर मार्च २०१७ मध्ये पूर्वनियोजित तारखेला या विद्यार्थ्यांची अंतिम online परीक्षा होईल.
6. जे विद्यार्थी परीक्षेच्या पहिल्या प्रयत्नात अनुत्तीर्ण होतील/गैरहजर राहतील अशा विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी re-exam फी भरून आणखी दोनच संधी त्यानंतरच्या लगतच्या दुमाही exam event मध्ये उपलब्ध होईल. या दोन re-exam ची संधी जानेवारी, मार्च, मे, जुलै व सप्टेंबर बॅचेससाठी उपलब्ध होईल. नोव्हेंबर बॅचसाठी re-exam ची एकच संधी उपलब्ध होईल.
    a. उदा. जानेवारी २०१७ बॅचच्या विद्यार्थ्यांची अंतिम online परीक्षा मार्च २०१७ मध्ये पूर्वनियोजित तारखेला होईल.
    b. अनुत्तीर्ण/गैरहजर विद्यार्थ्यांची पहिली अंतिम online पुनःपरीक्षा मे २०१७ मध्ये पूर्वनियोजित तारखेला होईल.

c. अनुत्तीर्ण/गैरहजर विद्यार्थ्यांची दुसरी अंतिम online पुनःपरीक्षा जुलै २०१७ मध्ये पूर्वनियोजित तारखेला होईल.

## ७. MS-Office 2013 License Software

1. प्रत्येक केंद्राला ह्या पूर्वीच MKCLतर्फे ५ Client Machine साठी Windows 7 व MS-Office **2013** License Package Software मोफत देण्यात आले आहेत.
2. ज्या केंद्रांना अजून ५ Client Machines साठी Windows 7 व MS-Office **2013** License Package Software घ्यावयाचे असतील त्यांनी त्यांच्या Solar लॉगीन मधून EOI देऊन annual subscription फी रु. ४०००/- solar advance system मधून भरावी.

## ८. SOLAR Advance व Awards System

1. MKCLतर्फे देण्यात येणाऱ्या कोणत्याही awardsची रक्कम केंद्राच्या solar advance account मध्ये जमा करण्यात येईल.
2. त्या awardsची रक्कम केंद्राला MS-CIT / KLiC / Mastering यापैकी कोणत्याही कोर्सेसच्या प्रवेशासाठी (MFO) म्हणून वापरता येईल.
3. मात्र त्या awardsची रक्कम केंद्राला solar advance account मधून काढून घेता येणार नाही. ती विहित मुदतीत न वापरल्यास आपोआप जप्त होईल.

## ९. Xtenda सेटअपचा पर्यायी वापर

ज्या केंद्राकडे Xtenda सेटअप आहे त्यांना त्याचा पर्यायी वापर खालीलप्रमाणे करता येईल:

1. **MS-CIT, MS-ACIT व KLiC** विद्यार्थ्यांना ERA बाह्य extra practice
2. **MKCL eSchool**: पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ICT सह सर्व प्रमुख विषयांच्या इ-लर्निंग व इ-टेस्टसह नव्या आकर्षक सुविधा. केंद्रानजिकच्या शाळांशी जूनपासून टायअप केल्यास MS-CIT सदृश उत्पनाची शक्यता
3. **MKCL Finishing School:** YCMOU चे BBA व B.Sc. Computer Hardware पदवी अभ्यासक्रम
4. **EASY व Digital Freelancing** द्वारे MS-CIT व KLiC विद्यार्थ्यांमार्फत केंद्राला व विद्यार्थ्यांना उत्पन्न
5. **MKCL सुराज्य**: नागरिकांना अभिनव पद्धतीने शासकीय सुविधा
6. **MKCL Mastering Series:**
    - Mastering Computer Typing & Data Entry
    - Mastering Engineering Subjects for FE/SE इंटर्नल व एक्स्टरनल Exams
    - Mastering GATE for PSU Jobs
    - Mastering MHT-CET
    - Mastering Banking (IBPS) & Railways
    - Mastering MPSC

- Mastering Talathi & Police Bharti
- Mastering STET and CTET

वरील 1 ते 6 संबंधी अधिक माहिती वार्षिक सभांमध्ये देण्यात येईल.

## १०. MI On Demand

1. वर्ष २०१७ मध्ये **मार्केटिंग इंटर्न (MI)** ची उपलब्धता केंद्रांच्या मागणीनुसार (on demand) करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.
2. ज्या केंद्राला MIच्या मदतीने Event करायचा असेल त्यांनी त्या event चे तपशीलवार आयोजन (स्थळ; दिनांक; वेळ; अवधी; आयोजक शाळा/कॉलेज/संस्था यांच्या संबंधित अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा, फोन नंबर; श्रोत्यांची पार्श्वभूमी; सादरीकरणात अपेक्षित असलेला/ले प्रॉड्ट्स; इ.) पक्के करून ते त्यांच्या solar login मधून MI साठी आगाऊ बुकिंग करताना भरणे आवश्यक असेल.
3. प्रत्येक Eventसाठी केंद्राला रु.४००/-  एवढे शुल्क solar login मधून आगाऊ भरावे लागेल.
4. त्या event मध्ये बुकिंग करणाऱ्या केंद्रासाठीच मार्केटिंग केले जाईल.
5. केंद्राच्या प्रतिनिधीने Event ला नियोजित वेळेपूर्वी व Event संपेपर्यंत उपस्थित राहणे आवश्यक आहे.
6. Event झाल्यानंतर समजा त्या केंद्राला तो event समाधानकारक वाटला नाही तर MKCL त्या eventची बुकिंग फी त्या केंद्राला परत करेल.
7. ज्या केंद्रांनी पाच वर्षांच्या renewal चा पर्याय निवडला असेल अशा केंद्रांना वर्ष २०१७ मध्ये एकूण १० MI Events परस्पर सोयीच्या दिवशी मोफत उपलब्ध असतील.

वरील बदल हे MS-CIT केंद्र तसेच त्यांच्या सॅटेलाईट केंद्रांनाही ही लागू असतील.

तुमच्या केंद्रातील MS-CITच्या प्रवेशांसाठी आणि २०१७मधील तुमच्या यशासाठी पुन्हा एकदा मनापासून शुभेच्छा देवून हे विशेष पत्र संपवितो.

आपला स्नेहांकित,

**विवेक सावंत**
**व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित**

टीप: वर केलेले बदल केवळ MS-CIT अभ्यासक्रमाला लागू करण्यात आलेले आहे. सध्या चालू असलेल्या KLiC कोर्सेसच्या प्रचलित कार्यान्वयनात कोणताही बदल प्रस्तावित नाही.